महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/**३४५६६**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक : १६.१२.२०१९**

# प रि प त्रक

**विषय : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सन २०२० या कॅलेंडर वर्षासाठी सार्वजनिक सुट्टया जाहीर करणेबाबत.**

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र. ०१ दिनांक २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी **सन २०२०** या वर्षासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या **२० सार्वजनिक सुट्टया** महावितरण कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता [कर्मचारी सेवा विनियमातील परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मध्ये समाविष्ट केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणारे कर्मचारी, तसेच स.सा.आदेश क्र. १२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या परिशिष्ट 'क' (ANNEXURE-'A') आणि त्यानंतरच्या दि. ०३.०४.१९९० व दि. १८.०८.१९९० च्या पूरकपत्रांमध्ये नमूद केलेल्या पदावर काम करणारे कर्मचारी वगळून] जाहीर करण्यास मंजूरी दिली आहे. सदर सार्वजनिक सुट्टया या राज्य शासनाने परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ (Negotiable Instruments Act 1881) खाली घोषित केलेल्या सार्वजनिक सुट्टया आहेत.

२. कर्मचारी सेवा विनियमाशी संलग्न असलेल्या परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') अंतर्गत मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कामाचे ठिकाण विचारात न घेता त्या कर्मचाऱ्यांना तसेच कंपनीची प्रशासकीय कार्यालये वगळता विद्युत उपकेंद्र अथवा कार्यालये/कार्यस्थाने (वर्क साईटस्/घटक/आस्थापना) या ठिकाणी काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना (ते कोणत्या परिशिष्टाखाली मोडतात हे विचारात न घेता) आणि सामान्य आदेश क्र. १२२ (क) दि. २२.०३.१९९० सोबतच्या परिशिष्ट 'क' (ANNEXURE-'A') व त्यासंबंधीची पूरकपत्रे दि. ०३.०४.१९९० व दि. १८.०८.१९९० यामध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन अगर त्याबद्दलची पर्यायी सुट्टी जमेस धरुन फक्त **६ (सहा) भरपगारी सुट्टया** जाहीर करण्यास मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजूरी दिली आहे. प्रभारी अधिकाऱ्यांची पूर्व मंजूरी घेऊन या कर्मचाऱ्यांना वरील प्रमाणे ६ (सहा) सुट्टया उपभोगता येतील.

३. नाममात्र हजेरीपटावरील आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना (नैमित्तिक कामगार वगळून) सन २०२० या वर्षी प्रजासत्ताक दिन (दि. २६ जानेवारी) व स्वातंत्र्य दिन (दि. १५ ऑगस्ट) या दोन राष्ट्रीय सणांच्या दिवशी तसेच महाराष्ट्र दिन (दि. १ मे) या राजकीय सणाच्या दिवशी भरपगारी सुट्टया मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुट्टीच्या दिवशी काम करणारे कर्मचारी बदली/पर्यायी सुट्टी मंजूर करुन घेण्यास पात्र राहतील.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या **eLibrary** वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्रे : **परिशिष्ट - 'अ'**

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

C:\Users\2336804\Desktop\1Holiday 2020.docx

परिशिष्ट 'अ'

(परिपत्रक मासं/रवका/न.क्र.९/३४५६६ दि. १६.१२.२०१९)

**महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्र.१०८ दि.०७.१२.२०१९ अन्वये:**

**(अ) सार्वजनिक सुट्या- २०२०:**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२० | बुधवार |
| २. | महाशिवरात्री | २१ फेब्रुवारी, २०२० | शुक्रवार |
| ३. | होळी (दुसरा दिवस) | १० मार्च, २०२० | मंगळवार |
| ४. | गुढीपाडवा | २५ मार्च, २०२० | बुधवार |
| ५ | राम नवमी | २ एप्रिल, २०२० | गुरुवार |
| ६. | महावीर जयंती | ६ एप्रिल, २०२० | सोमवार |
| ७. | गुड फ्रायडे | १० एप्रिल, २०२० | शुक्रवार |
| ८. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२० | मंगळवार |
| ९. | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०२० | शुक्रवार |
| १०. | बुध्द पौर्णिमा | ७ मे, २०२० | गुरुवार |
| ११. | रमझान ईद (ईद-उल-फितर) (शव्वल-१) | २५ मे, २०२० | सोमवार |
| १२. | बकरी ईद (ईद-उल-झुआ) | १ ऑगष्ट, २०२० | शनिवार |
| १३. | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगष्ट, २०२० | शनिवार |
| १४ | गणेश चतुर्थी | २२ ऑगष्ट, २०२० | शनिवार |
| १५. | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर, २०२० | शुक्रवार |
| १६. | ईद-ए-मिलाद | ३० ऑक्टोबर, २०२० | शुक्रवार |
| १७. | दिवाळी (लक्ष्मीपुजन) | १४ नोव्हेंबर, २०२० | शनिवार |
| १८. | दिवाळी (बलिप्रतिपदा) | १६ नोव्हेंबर, २०२० | सोमवार |
| १९. | गुरुनानक जयंती | ३० नोव्हेंबर, २०२० | सोमवार |
| २०. | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०२० | शुक्रवार |

**(ब) खालील सुट्टया महिन्याच्या रविवारी येत असल्यामुळे त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही:**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०२० | रविवार |
| २ | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | १६ ऑगस्ट, २०२० | रविवार |
| ३. | मोहरम | ३० ऑगष्ट, २०२० | रविवार |
| ४. | दसरा | २५ ऑक्टोबर, २०२० | रविवार |

**(क) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. सार्वसु-१११९/प्र.क्र.६९/२९ दि. ०७.१२.२०१९ नुसार मुंबई (शहर) व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी खालील प्रमाणे स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आल्या आहेत:**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १ | गोपाळकाला (दहिहंडी) | १२ ऑगष्ट, २०२० | बुधवार |
| २ | अनंत चतुर्दशी | ०१ सप्टेंबर, २०२० | मंगळवार |

C:\Users\2336804\Desktop\1Holiday 2020.docx